# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १०२ वा ❑ शनिवार दि.३१ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बलुच बंडखोरांसोबत चीन !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पाकिस्तान ज्या चीनला आपला सर्वात विश्वासू मित्र मानतो, त्याने त्याच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, चीनने बलुच बंडखोरांशी थेट संपर्क स्थापित केला आहे, ज्यामुळे पाकिस्तानची एकता, सार्वभौमत्व आणि अखंडतेला धक्का बसला आहे. बलुच बंडखोरांना चिरडून टाकण्याच्या रणनीतीवर काम करणाऱ्या पाकिस्तान सरकार आणि लष्कराच्या तोंडावर ही एक चपराक आहे.

चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरच्या सुरक्षेसाठी ड्रॅगनने बलुच बंडखोर संघटनांशी थेट संपर्क साधण्याचा निर्णय घेतला आहे. हा स्पष्ट संदेश पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनाही देण्यात आला होता जे बीजिंगच्या दौऱ्यावर होते. परंतु चीनच्या प्रभावाखाली असलेल्या पाकिस्तानने याबद्दल काहीही सांगितले नाही.

**आर्थिक कॉरिडॉरबद्दल चिंता**

चीन आशिया ते युरोपपर्यंत ज्या आर्थिक कॉरिडॉरवर काम करत आहे तो देखील पाकिस्तानातील बलुचिस्तानमधून जातो, परंतु बलुचिस्तानमधील संघटनांकडून त्यांच्या नागरिकांवर आणि प्रकल्पांवर सतत हल्ले होत आहेत. पाकिस्तानी सैन्य त्यांना रोखण्यात अपयशी ठरले आहे. ग्वादर बंदर आणि रेको डिक खाणकामाचे प्रकल्प रखडले आहेत आणि चीनचे नुकसान वाढत आहे.

**६० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीबद्दल चिंता**

वृत्तांनुसार, चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर मध्ये ६० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीच्या सुरक्षेबद्दल चीन चिंतेत आहे. दुसरीकडे, अमेरिकेने बलुचिस्तानमधील खनिज साठ्यांवरही आपले लक्ष केंद्रित केले आहे. चीनला आता चांगलेच समजले आहे की बलुचिस्तानवरील खरे नियंत्रण बलुचिस्तान संघटनांकडे आहे, एक दशक पाकिस्तानी सैन्यावर विश्वास ठेवल्यानंतरही, चीनला फसवणूक झाल्याचे वाटत आहे. बलुचिस्तान बंडखोर संघटनांच्या हल्ल्यात अनेक चिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. चिनी अधिकाऱ्यांचा असा विश्वास आहे की बलुचिस्तान संघटनांशी बोलून बंडखोरांचे हल्ले, त्यांच्या नागरिकांचे मृत्यू आणि कोणत्याही सुरक्षेशिवाय खनिज उत्खनन थांबवता येईल.

**दुबईमध्ये गुप्त चर्चा झाली**

२०१९ च्या गुप्त चर्चेदरम्यान चीननेही अशीच एक चाल खेळली होती. दुबईतील चर्चा अयशस्वी झाली. काही बंडखोर संघटना चर्चेसाठी पुढे आल्या, परंतु काही संघटना चीनच्या हेतूंबद्दल संशयास्पद राहिल्या. या बंडखोर संघटनांनी चीनसमोर स्वायत्तता, कमाईत वाटा आणि पाकिस्तानी सैन्याच्या कारवाईवर बंदी यासारख्या मागण्या मांडल्या. चीनसमोर आव्हान म्हणजे वेगवेगळ्या बंडखोर संघटनांशी स्वतंत्रपणे कसे बोलायचे. चीनला आर्थिक कॉरिडॉरच्या मार्गावर आपल्या चौक्या बांधायच्या आहेत, परंतु बलुच बंडखोर त्याला तीव्र विरोध करतात, कारण हे त्यांच्या दडपशाहीचे एक नवीन शस्त्र ठरू शकते.

**बलुचिस्तानमध्ये खनिज खजिना लपलेला आहे**

बलुचिस्तानमध्ये सहा लाख कोटी रुपयांचे खनिज साठे असल्याचा अंदाज आहे. यामध्ये तांबे, सोने आणि लिथियमचे साठे आहेत. चीनच्या मोठ्या कर्जाच्या ओझ्याने दबलेल्या पाकिस्तानकडे या हालचालीला विरोध करण्याचे धाडस नाही ज्यामुळे तो नष्ट होईल.

# भारतातील हिंदू समाज सामर्थ्यवान झाल्यास जगभरातील हिंदूंनाही सामर्थ्य

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

**जागतिक व्यवस्थेत लष्करी शक्ती, राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक शक्ती यांचे स्वतःचे महत्त्व आहे. संघाचे याबद्दल मत काय?**

बलशाली होणे हे अपरिहार्य आहे. संघाच्या प्रार्थनेत एक ओळ आहे – ''अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिं''. आपल्यावर कोणीही विजय मिळवू शकणार नाही, इतके सामर्थ्य आपल्यात असलेच पाहिजे. सुरक्षेच्या बाबतीत आपण कोणावरही अवलंबून राहू नये. आपली सुरक्षा आपण स्वतः करायला हवी, आपल्याला कोणीही जिंकू शकणार नाही, संपूर्ण जग एकत्र आले तरी आपल्याला हरवू शकणार नाही, इतके सामर्थ्य आपल्याकडे असले पाहिजे. कारण जगामध्ये काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक आहेत, जे स्वभावानेच आक्रमक आहेत. सज्जन व्यक्ती केवळ सज्जनतेमुळे सुरक्षित राहत नाही. सज्जनतेसोबतच शक्तीही आवश्यक आहे. केवळ शक्ती असेल, पण दिशा नसेल, तर ती हिंसेचे कारण बनते. म्हणूनच शक्तीसोबत सज्जनतेची जोड आवश्यक आहे. ह्या दोघांची साधना आपल्याला करावी लागेल. भारत अजेय व्हावा. ''परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम्'' असा सामर्थ्यवान देश व्हावा. जेव्हा दुसरे कोणतेही उपाय उरत नाहीत, तेव्हा दुष्टतेला शक्तीच्या बळावर नष्ट करावेच लागते. पण त्याचवेळी जर स्वभाव सज्जन असेल, तर रावणाचा संहार करून



त्याच्या जागी विभीषणाला राजा बनवून आपण परततो असा विचार असतो. हे सर्व आपण करत आहोत ते जगावर आपली छाप पाडण्यासाठी नाही, तर सर्वांचे जीवन निरोगी, समर्थ व सुरक्षित व्हावे यासाठी. आपणास सामर्थ्यसंपन्न व्हावेच लागेल, कारण आपल्या सीमांवर आपण दुष्ट लोकांच्या दुष्टतेचा अनुभव घेत आहोत.

**भारताच्या भाषिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेचा विचार करता, संघ सर्वसमावेशतेला कसे प्रोत्साहन देत आहे?**

भाग – २

संघात येऊन पाहा. सर्व भाषा, पंथ, संप्रदाय यांचे लोक आनंदाने एकत्र येऊन संघात कार्य करतात. संघाचे गीत फक्त हिंदीमध्येच नाहीत, तर अनेक भाषांमध्ये आहेत. प्रत्येक भाषेत संघ गीत गाणारे गायक, गीतांची रचना करणारे कवी आणि संगीत तयार करणारे संगीतकार आहेत. तरीही संपूर्ण भारतभर संघ शिक्षा वर्गांमध्ये दिली जाणारी तीन गीते सर्वत्र गायली जातात. सर्वजण आपापल्या वैशिष्ट्यांना जपून, एक राष्ट्रीयत्वाचा सन्मान आणि संपूर्ण समाजाची एकता याची जाणीव ठेवून कार्य करतात. हाच संघ आहे. इतक्या विविधतेने भरलेल्या समाजाला एका सूत्रात बांधणारे सूत्र आम्ही देतो.

**संघ सामाजिक समरसतेची गोष्ट करतो आणि त्यासाठी कार्यही करतो. पण काही लोक आहेत, जे समानतेची गोष्ट करतात. या दोघांमध्ये तुम्ही काय फरक पाहता?**

समानता आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात यावी लागते. अन्यथा तिचा काही अर्थ राहत नाही. बंधुभाव हाच समरसता आहे. स्वातंत्र्य आणि समता यांचा आधारसुद्धा बंधुता आहे. समता जर स्वातंत्र्याशिवाय आली तर ती संकुचित होते आणि जर टिकवायची असेल, तर तिला बंधुभावाचा आधार लागतो. हाच बंधुभाव म्हणजे समरसता आहे. समता यासाठी एक पूर्वअट म्हणजे समरसता. जात-पात आणि अस्पृश्यतेविरुद्ध कायदे झाले तरी विषमता जात नाही, कारण ती मनात असते. ती मनातून काढून टाकायला हवी. सर्वजण आपले आहेत, म्हणून आपण सारे समान आहोत असे मानणे आवश्यक आहे. दिसायला समान नसले तरी आपण एकमेकांचे आहोत, आपुलकीने जोडलेले आहोत ह्यालाच समरसता म्हणतात. प्रेमभाव, बंधुभाव ह्यालाच समरसता म्हणतात.

# जिजामाता सन्मान पुरस्कारांचे शानदार सोहळ्यात वितरण

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – खेळाडूंच्या यशामागील मातांचे योगदान समाजासमोर आणणाऱ्या जिजामाता सन्मान पुरस्कारांचे शानदार सोहळ्यात वितरण. ''फिटनेस फॉर ऑल, खेलो इंडिया गेम्स यासारख्या चांगल्या व दूरगामी योजनांमुळेच आपल्या देशात गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये क्रीडा क्षेत्रासाठी सकारात्मक व पोषक वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळेच क्रीडा क्षेत्रात देशाची भरभराट झाली आहे'' असे राज्याचे क्रीडा व युवक मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी सांगितले.

क्रीडा भारती संस्थेतर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमक दाखविणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा जिजामाता पुरस्काराने क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे व तेनसिंग नोर्गे सन्मानित गिर्यारोहक व संघटक उमेश झिरपे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी क्रीडा भारती संस्थेचे अखिल भारतीय महामंत्री राज चौधरी व पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय पुरंदरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

श्री. भरणे पुढे म्हणाले की ''महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांमध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि खेलो इंडिया स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण अव्वल दर्जाची कामगिरी केली आहे. राज्य शासन नेहमीच खेळाडूंना सहाय्य करण्यासाठी सर्वतोपदी प्रयत्न करीत असते आणि यापुढेही करणार आहे.

प्रत्येक खेळाडूच्या यशामध्ये त्यांच्या आई-वडिलांनी केलेल्या त्यागाचा आणि कष्टाचा मोठा वाटा असतो मात्र आई-वडील कायमच प्रसिद्धीपरान्मुख असतात''. ''खेळाडूंच्या पालकांचा सत्कार करीत क्रीडाभारतीने सर्वांपुढे मोठा आदर्श निर्माण केला आहे'' असे सांगून झिरपे म्हणाले की ''क्रीडाक्षेत्र हे करिअरसाठी उत्तम क्षेत्र झाले असून गिर्यारोहण क्षेत्रातही करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत.''

श्री राज चौधरी यांनी जिजाऊंचे कर्तृत्व आणि खेळाडूंच्या मातांचा जिजामाता सन्मान पुरस्काराने गौरव यामागील भूमिका विषद केली.

यंदाच्या जिजामाता पुरस्कार विजेत्यांमध्ये कुस्तीगीर अमोल बराटे याची आई श्रीमती चंदा, कबड्डीपटू आम्रपाली गलांडे यांची आई सुरेखा, वुशूपटू कल्याणी जोशी हिची आई अनुराधा, बुद्धिबळपटू आदित्य सामंत याची आई संध्या, स्केटिंगपटू श्रुतिका सरोदे हिची आई रंजना, मॉडर्न पेन्टथलॉन खेळाडू विराज परदेशी याची आई बेला,



ॲथलेटिक्स खेळाडू यमुना लडकत हिची आई सुनंदा, एव्हरेस्टवीर भूषण हर्षे याची आई भाग्यश्री, योगासनपटू नितीन पवळे याची आई जयश्री, प्रस्तारोहण खेळाडू सानिया शेख हिची आई निगर, तायक्कांदोपटू कोमल घारे सुरेखा, अश्व रोहन खेळाडू आशिष लिमये याची आई डॉक्टर विमला, यांचा समावेश होता. याच कार्यक्रमामध्ये युवा खेळाडू सान्वी गोसावी (टेनिस), सिद्धी जाधव (टेनिक्काईट), आरूष जोशी (क्रिकेट), कार्तिकी राक्षे (बॉलबॅडमिंटन), आदित्य गाडे (ॲथलेटिक्स), गार्गी भट (योगासन) यांचा सत्कार करण्यात आला.

क्रीडा भारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व संघटक शरदराव गोडसे यांना क्रीडा भारती जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर राज्य शासनाचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या क्रीडा भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या श्रीमती शकुंतला खटावकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी शरदराव गोडसे तसेच सत्कारार्थींतर्फे अनुराधा जोशी व भाग्यश्री हर्षे यांनीही आपले विचार व्यक्त केले. प्रा. शैलेश आपटे यांनी प्रास्ताविक केले तर विजय राजपूत यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनुजा दाभाडे, जयसिंग जगताप, मनाली देव यांनी केले.

# 'खजिन्याची शोधयात्रा' पुस्तकाच्या माध्यमातून देशाचे प्राचीन वैभव, इतिहास, संस्कृतीची मांडणी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाच्या लेखनासाठी प्रशांत पोळ यांनी व्यापक संशोधन आणि अभ्यास केला आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून देशाचे प्राचीन वैभव, इतिहास, संस्कृती मांडण्यात आली असल्याने शासनाच्या माध्यमातून हे पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञानाचा मोठा खजिना जनतेपर्यंत जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. प्रशांत पोळ लिखित 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, मध्य प्रदेशचे सार्वजनिक बांधकाम मंत्री राकेश सिंह, मंदिर स्थापत्य व मूर्तीशास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक व पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे आदी उपस्थित होते.

प्रशांत पोळ यांचे पुस्तक लेखनासाठी अभिनंदन करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आपला इतिहास, परंपरा, संस्कृतीचे जतन करणे आपले कर्तव्य आहे. आपल्या समाजाचे तेज आणि आत्माभिमान संपविण्याचे काम परकियांनी केल्याने आपण पारतंत्र्यात गेलो. भारत समृद्ध देश होता, परकीय आक्रमकांनी आपल्या संपत्तीची लूट केली. आपले ज्ञान आणि संस्कृती ही आपली शक्ती आहे हे लक्षात घेऊन ज्ञानकेंद्रे उध्वस्त करणे, आपल्या संस्कृतीची प्रतिके जमिनदोस्त करणे आणि आपल्यावर त्यांची संस्कृती, परंपरेचा पगडा बसविण्याचे काम सातशेहून अधिक वर्ष चालले. त्यामुळे आपला इतिहास माहित नसलेल्या पिढ्या तयार झाल्या आणि भारत पारतंत्र्यात गेला. वेगवेगळ्या संशोधकांनी आपल्या संशोधनाने आपली संस्कृती भारताबाहेर गेली हा निष्कर्ष काढला आहे. जगातील इतर संस्कृती नष्ट पावल्या आहेत. पूर्वीपासून असलेली आणि अजूनही चालत आलेली भारत ही एकमेव संस्कृती आहे. ढोलावीरा,




लोथलबद्दल प्रशांत पोळ यांनी पुस्तकात वर्णन केले आहे. आजच्या स्थापत्य शास्त्राला अपेक्षित गोष्टी सहा हजार वर्षांपूर्वी असल्याचे त्यातून पहायला मिळते.

युरोपीय देशात जेव्हा संस्कृतीची संकल्पना स्पष्ट नव्हती तेव्हा आपली संस्कृती विकसित स्वरुपात होती. संस्कृतसारखी भाषा विकसित स्वरुपात आपल्याला माहित होती. भारताचा हा ज्ञानाचा खजिना फार जुना आहे. ही सिंधू संस्कृतीदेखील आहे आणि सरस्वती संस्कृतीदेखील आहे. भौतिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न अशी ही संस्कृती होती. पहिल्या शतकातले भारताचे जगातील व्यापारातले स्थान ३३ टक्के होते. आपल्या या इतिहासाची माहिती आपल्याला असायला हवी. देशाचा हा इतिहास, आपले वैभव आणि गणितात भारताने केलेली प्रगतीदेखील या पुस्तकातून मांडण्यात आली आहे.

देशात हिंदवी स्वराज्य, मराठ्यांचे साम्राज्य होते ते आपण शिकू शकलो नाही. त्यामुळे आपली संस्कृती ज्ञान आपल्याला माहिती पाहिजे आणि ते पुढेही न्यावे लागेल. आयुर्वेदातील संहितावरही संशोधन झाले पाहिजे. या पुस्तकातून सर्वांना मार्गदर्शन मिळेल. ज्ञानाची ही शोधयात्रा अशीच सुरू रहावी, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली.

यावेळी मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, भारताला जगद्गुरू पदापर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय ज्ञानपरंपरेची माहिती, जाणिव, महत्त्व लक्षात आणून दिले पाहिजे. त्यासाठीच नव्या शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञानाची परंपरा समाविष्ट करण्यावर भर देण्यात आला आहे. पोळ यांच्या पुस्तकात प्राचीन काळातील व्यापार वैभवाचेही वर्णन करण्यात आले आहे. पुस्तकातून अशा अनेक नव्या बाबी मांडल्या आहेत. मध्यप्रदेशचे मंत्री सिंह म्हणाले, भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन होत असताना लेखणीच्या माध्यमातून देशाचा इतिहासही नागरिकांसमोर येत आहे. हे पुस्तक भारताला जाणून घेण्यासाठीची आणि देशाच्या सांस्कृतिक वैभवाचे स्मरण करण्यासाठी दिलेली हाक आहे. प्रशांत पोळ यांच्यासारख्या लेखकांमुळे आपण देशाचे सांस्कृतिक वैभव अनुभवू शकतो. त्यांच्या लेखणीत प्रामाणिकपणासोबतच भारताच्या संस्कृती प्रति निष्ठा आहे, असे त्यांनी सांगितले. हे पुस्तक देशाच्या सर्व भाषेत प्रकाशित होऊन देशभरात पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. डॉ. देगलुरकर म्हणाले, भारतीय संस्कृती जगातील पहिली संस्कृती आहे, ती समाजानुसार बदलणारी आहे. आपली संस्कृती प्रवाही आहे. वेद, उपनिषदे, भगवद्गीतेतील ज्ञान आपण जगासमोर ठेवले. आपली विचारांची श्रीमंती आपल्या लक्षात येत नाही. भारतीय संस्कृती, ज्ञानोपासना, विचारांकडे पाहिल्यास हा ज्ञानाचा खजिना जनतेसमोर येण्याची गरज आहे. असे भारतीय प्राचीन ज्ञान समाजासमोर आल्यास देशाचा अभ्युदय निश्चितपणे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रशांत पोळ म्हणाले, २०१७ साली प्रकाशित 'भारतीय ज्ञानाचा खजिना' या पुस्तकाला सर्व शासकीय वाचनालयात वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. भारतीय विचारवंत अनेक ज्ञानशाखांमध्ये जगामध्ये पुढे होते. दुर्दैवाने जगात ज्या परदेशी संशोधकांच्या नावावर विविध शोधांचे जनक असे नाव लागले ते अनेक शोध त्यापूर्वी भारतात लागलेले आहेत. मात्र, ते आपल्याला पुढे सांगितले गेले नाही. जगाचे विश्वगुरू होण्यासाठी आपण प्रयत्न करत असताना आपल्याला आपल्या समृद्ध संस्कृतीची, ज्ञानपरंपरेची माहिती आणि अभिमान असला पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी राजेश पांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. खजिन्याच्या शोधात हे पुस्तक देशाच्या वैभवावर आधारित आहे. पुणे पुस्तकप्रेमींचे शहर असल्याने या पुस्तकालाही वाचक प्रतिसाद देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## प्रत्येक नातं आर्थिक तराजूने तोलू नये

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या सधनतेचा गैरफायदा तर कोणी घेत नाही ना? ह्याची जाणीव प्रत्येकाला असतेच. परंतू तरी देखील भावनिक पातळीवर मैत्रीचे, नात्याचे, प्रेमाचे संबंध प्रस्थापित करून आर्थिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक, कौटुंबिक बाबतीत इमोशनल ब्लॅकमेलिंग करण्याच्या घटना देखील अलीकडच्या काळांत मोठ्या प्रमाणांत उघड होत चालल्या आहेत. आर्थिक व्यवहार होत राहतो तो पर्यंत ''तेरी बी चूप आणि मेरी बी चूप'' अशी परिस्थिती असते. कालांतराने व्यवहार खंडित झाला कि, इमोशनल ब्लॅकमेलिंग सुरु होतं. ह्याबाबतीत संबंधीताचा हेतू झटपट श्रीमंत होऊन सधनता साधण्याचा असल्याचं का समजू शकत नाही? इमोशनल ब्लॅकमेलिंग होण्याची वेळ का बरं येऊ दिली जाते? ह्या प्रकारे जेव्हा गैर फायदा घेतला जातो तेव्हा काहीअंशी चुकीच्या गोष्टी घडल्या असण्याची शक्यता असते. का बरं त्याचीसुद्धा जाणीव होत नाही? इमोशनमध्ये आडकायला असं काय भाग पाडत असतं? आपली इमोशन्स आपल्या उणिवा का बरं ठरतात? दिवसेंदिवस वाढत चाललेल्या इमोशनल ब्लॅकमेलिंगच्या समस्येचा गांभीर्याने विचार होणं जरुरीचं आहे.

आपल्याला काय आणि किती हवंय ह्याची देखील जाणीव असणं जरुरीचं असतं. भूक आहे तेवढं खाणं ही प्रकृती, भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणं ही विकृती आणि वेळप्रसंगी स्वतः उपाशी राहून दुसऱ्यांची भूक भागवणे ही संस्कृती. ह्याही पलीकडे जाऊन जी तयार होत असते, ती कलाकृती. ज्यामध्ये अशा व्यक्तीचा आकृतिबंध चार चौघांपेक्षा निराळा असतो, ते त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं, ज्यांत अत्यंत निराळे विचार, वर्तन आणि व्यवहार सामावलेले असतात; ते त्या व्यक्तीच्या व्यक्त होण्यातून दिसत असतात.

***

## जे सत्य सुंदर सर्वथा...




ज्योतिर्मय साहित्य

ज्यांना इतरांचे दुःख दिसते, वेदना जाणवतात, त्यांच्या काळजात आईची माया असते. कोणाचातरी आवंढा त्यांच्या गळ्यात दाटून आलेला असतो. अशावेळी त्यांना अन्न गोड लागत नाही. असे लोक रस्त्यावर उतरतात, भुकेलेल्याला दोन घास देतात, तहानलेल्यांना पाणी देतात, थंडीने गारठणाऱ्या अशक्त शरीरावर मायेचे उबदार पांघरूण घालतात. असे हात परमेश्वराचेच हात असतात. बा भ बोरकर यांनी म्हटल्याप्रमाणे देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे, मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे... असे ते हात असतात...! असे देखणे हात आम्हाला होता येईल का ?




कवी अरुण कमल यांची मूळ हिंदीत असलेली एक अनुवादित कविता या ठिकाणी द्यावीशी वाटते. खूपच हृदयस्पर्शी आहे.

लोककथा
एके काळची गोष्ट आहे
कुणा एका गावात
शेतकऱ्याच्या घरी
दरोडा पडला रात्री
तिसऱ्या प्रहरी .
आणि त्याचा थोरला मुलगा...
दोन महिन्यांपूर्वीच त्याची पत्नी नांदायला आली होती
वळईच्या चौकटीत कोसळला निपचित
वाचवताना दागिने.
सकाळ झाली
झाली प्रेत उचलायची वेळ
तर शेतकरी पुढे झाला
त्याचा धाकटा मुलगा
आणि म्हातारा बाप.
तरीही एक खांदा कमीच पडत होता.
पण गावातला एकही माणूस आला नाही.
सगळ्यांना वाटलं दरोडेखोरांना बरं वाटणार नाही.
तेव्हा तिघांनी उचललं प्रेत आणि मुलाला बापाने अग्नी दिला.
गोष्ट गेली रानात
विचार करा मनात.
एक खांदा कमी पडतो आहे पण खांदा द्यायला जायचं नाही असं आम्ही ठरवलं आहे. आम्ही कोणाची मदत करतो आहोत ? त्या शेतकऱ्याची की दरोडेखोरांची ? सत्य आपल्याला समजलेलं नाही की आपल्याला समजूनच घ्यायचं नाही?

म्हणून तर त्या दयाघनाला प्रार्थना करायची
तू बुद्धी दे, तू तेज दे नवचेतना विश्वास दे
जे सत्य सुंदर सर्वथा, आजन्म त्याचा ध्यास दे...



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## नवविधा भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार सज्जन वाचक मित्रांनो

काल आपण २१ व्या ओवीचा अभ्यास करत होतो.

भूतजय कशाला म्हणतात?

योग्याचे व्यक्तिगत मन जसजसे विश्वमनाशी एकरूप होते तादात्म पावू लागते तसतसे ते अत्यंत सूक्ष्म व विशाल बनत जाते. पंचमहाभूतांवर योग्याचे स्वामित्व अढळ होते. तो सदचित् स्वरूप होतो. आत्मानंदी तो भगवंताशी काया,वाचा मनाने जोडला जातो त्याला भूतजय म्हणतात. भूतजय साधला की योग्याच्या अंगी अनेक प्रकारच्या विलक्षण शक्ति प्रगट होतात. तो भगवंताशी काया,वाचा,मनाने जोडला जातो. तादात्म पावतो अफाट चातुर्य, विलक्षण प्रखर बुद्धी, सर्व व्यापी सदाचार दिसतो.

१)अणिमा--- म्हणजे सुक्ष्मपणा आणण्याची शक्ति
२)लघिमा--- म्हणजे अत्यंत हलके होण्याची कला.
३)महिमा--- म्हणजे अत्यंत विशाल होण्याची शक्ति
४)प्राप्ति--- म्हणजे हवे ते मिळवण्याची शक्ति
५)प्राकाम्य---- म्हणजे इच्छा फलद्रूप होण्याची कला.
६)वशित्व --- म्हणजे चराचर विश्व वश करून घेण्याची कला.
७)ईशित्व---म्हणजे विश्वातील सर्व व्यापारावर स्वमित्व गाजवण्याचे सामर्थ्य.
८) यत्रकामावसायित्व-- आप्तकाम व पूर्ण काम होणे. वाटेल तेव्हा वाटेल त्या ठिकाणी जाता येणे.

वात, पित्त, कफ कोणत्या दोषाने कोणता रोग होतो हे अभ्यासून आपले आचरण ठेवावे. नरकातील कुंभिपाक, तेथील नाना यातना, यमलोक, स्वर्गातील. सुख,नरकातील दुःख याविषयी अभ्यास करावा. वसकल जनांना वाईट गोष्टींपासून परावृत्त करावे.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामसाधन कसे करावे ?

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे साधन कसे करावे ? एखाद्या दगडावर पुष्कळ पाणी एकदम ओतले तर तो दगड भिजेल आणि पाणी निघून जाऊन कोरडा होईल. पण तेच पाणी थेंब थेंब असे एकाच ठिकाणी आणि अखंड पडत राहिले तर त्या दगडाला भोक पडेल, आणि काही दिवसांनी दगड फुटूनही जाईल; त्याप्रमाणे, केव्हातरी पुष्कळ साधन करण्यापेक्षा अगदी अल्प प्रमाणात का होईना पण नित्यनेमाने, ठराविक वेळी, आणि शक्य तर ठराविक स्थळी, जर नामाचे साधन केले तर ते जास्त परिणामकारक होते. जात्याला दोन पेठी असतात; त्यातले एक स्थिर राहून दुसरे फिरत राहिले तर दळण दळले जाऊन पीठ बाहेर पडते. पण जर दोन्ही पेठी फिरत राहिली तर दळण दळले न जाता फुकट श्रम मात्र होतात. माणसाचे शरीर आणि मन अशा दोन पेठी आहेत. त्यांतले मन हे स्थिर आहे आणि देह हे फिरणारे पेठे आहे. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे, आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो. प्रारब्धरूपी खुंटा देहरूपी पेठयात बसून तो त्याला फिरवतो, आणि मनरूपी पेठे स्थिर असते. देह प्रारब्धावर सोडावा, आणि मन भगवंताच्या स्मरणात स्थिर ठेवावे, याहून नामाचे साधन दुसरे काय ? हे साधन अमक्यालाच साधेल असे नाही, तर ते कोणालाही साधेल. गरिबाला गरिबीचे दुःख होते म्हणून साधत नाही, तर श्रीमंताला पैशाचा अभिमान आणि लोभ असतो म्हणून साधत नाही; विद्वानाला विद्येचा अभिमान होतो म्हणून साधत नाही, तर अडाण्याला काय करावे हे समजत नाही म्हणून साधत नाही. साशंक वृत्तीने कितीही साधन केले, कितीही नामस्मरण केले, तरी कधी समाधान होणार नाही.

नीतिधर्माचे आचरण, शास्त्रशुध्द वर्तन, शुद्ध अंतःकरण, आणि भगवंताचे स्मरण, इतक्या गोष्टी असतील तरच साधक शेवटपर्यंत पोहोचेल; आणि शेवटपर्यंत तो पोहोचला तरच फायदा. घरी पोहोचल्यावर पत्र लिहा असे म्हणतात, याचा अर्थ हाच आहे. प्रपंच करीत असताना वाईट विचार मनात येत ात, त्याचप्रमाणे परमार्थ करीत असतानाही वाईट विचार आले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. ज्यावेळी वाईट विचार मनात येतील त्यावेळी भगवंताचे नाम घेतले तर त्या विचारांची मजल पुढे जाणार नाही. दृढ विश्वासाने नाम चालू ठेवावे. जिथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृति आहे तिथेच समाधानाची प्राप्ती होते. भगवंता, मी तुझा आहे असे रात्रंदिवस म्हणत गेल्याने भगवंत प्रकट होत जाईल; आणि भगवंत जितका प्रकट होत जाईल तितके मी पणाचे दडपण आपोआप कमी होत जाईल.

प्रारब्धाची व ग्रहांची गती देहापर्यंतच आहे. मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही.

॥ संत महात्म्य ॥

## महात्म्यांच्या आविष्कार

ज्योतिर्मय साहित्य

या लेख मालेच्या प्रारंभापासून आपण भगवंता सोबत अवतीर्ण झाले त्यांचे सोबत जे महात्मे प्रभूचे नातेवाईक म्हणून, जे महात्मे श्री राधा राणीच्या सख्या म्हणून तर जे महात्मे प्रभूचे सखा,सवंगडी म्हणूनच अवतरले त्यांचा कथा आपण पहात आहोत. चरित्र ते उच्चारावे देवें केले गोकुळी. असे म्हणतात. भगवंताच्या, संतांच्या चरित्राचे गायन श्रवण करणे हा भक्ती मार्गाचा उत्तम उपाय सांगितला आहे.

भगवंताचे ८ सवंगडी भगवंता सोबत अवतारात आले त्यांची नावे आपण मागील भागात पाहिली. हेच ८ सखा कलियुगात ही अवतरित झाले. इसवीसनाच्या १५ व्या शतकात धर्म ग्लानी आलेल्या समाजाला. यांनी नवं संजीवनी दिली.

भगवंतावर प्रेम म्हणजे त्याने निर्मित सर्व भूत्मात्रावर प्रेम. या जगताच्या कणा कणात आनंद हुडकायचा, सर्व जीव जंतुला प्रभू समजून प्रेम करायचे हे या महात्म्यांनी या अवतारात शिकविले.

मागील भागात आपण संत श्रेष्ठ श्री सूरदास यांचे अल्प चरित्र पाहिले.आता द्वापार युगात भगवंता सोबत अवतरीत झालेले अन्य सवंगडी ज्यांचा कलियुगात, अलीकडेच, अवतार झाला त्यांचे चरित्र पाहू.

२) परमानंद : श्री परमानंद या श्रेष्ठ कृष्णभक्त कवीचे पूर्वाश्रमीचे नाव अनिरुद्ध कुमार पांडे असे होते. त्यांचा जन्म संवत १५५०, उत्तर प्रदेश मधील कन्नौज येथे झाला. आणि त्यांचा मृत्यू ज्येष्ठ शुद्ध द्वादशी संवत १५७७मध्ये झाला. हे ९१ वर्ष जगले.

हे पूर्व जन्मी श्रीकृष्णाचा टोक नावाचा सखा होते. आणि चंद्रभागा नावाची जी राधेची सखी होती त्यांचाच हा अवतार मानला जातो.

त्यांच्या आईचे नाव रमादेवी आणि वडील शंभू पांडे असे होते.

यांच्या एकूण ८३५ रचना उपलब्ध आहेत. त्यांची एक रचना अतिशय गोड आहे

आज दधि मिठो मदनगोपाल /
भावो मोही तुम्हारो झुटो /
सुंदर नयन विशाल //बहुत दिवस हम रहे कुमुद वन/ कृष्ण तिहारे साथ //
ऐसे स्वाद हम कबहून देखो सुनो गोपाल के नाल....

३) गोविंद दास स्वामी :

पुष्टी संप्रदायाचे संस्थापक श्री वल्लभाचार्य यांनी त्यांचे चार शिष्य आणि वल्लभाचार्यांचे पुत्र आणि शिष्य श्री विठ्ठल दास यांचे चार शिष्य असे एकत्रित आठ शिष्यांत समूह तयार केला होता. यांनाच अष्ट छाप कवी असे म्हणतात. त्यातील गोविंददास स्वामी हे श्री विठ्ठलदास यांचे शिष्य होते. यांचा जीवन काल इसवी सन १५०५ ते १५८६ असा झाला. यांची तपोभूमी गोवर्धन पर्वतावर आणि ऐरावत कुंडा जवळ जातिपुरा जवळ हे स्थान आहे येथे होती.

हे रोज गोड आवाजात भगवंताला विविध पदे ऐकवीत. हे श्री दामा यांच्या अवतार आहेत. भगवत भक्तीत ते इतके लीन होते की, सतत भगवंत आपल्या सोबत आहेत, त्यांची आपण सेवा करतो आहोत या दृढ भावाने त्यांनी भक्ती केली. गोवर्धन पर्वतावर ते जिथे रहात तिथे त्यांनी भगवंता साठी एक झोका बांधला होता. प्रभू या झोक्यावर बसून, त्यांना आपण झोका देत आहोत, या निर्मळ भावाने, ते सदैव प्रभूची सेवा करीत.

या श्रेष्ठ संतांच्या विमल चरणावर नतमस्तक होऊ यात. प्रगाढ भक्तीची परिसीमा गाठणाऱ्या या संतश्रेष्ठ भक्तांना विनम्र अभिवादन करुयात.

हरी बोल हरी बोल हरी हरी बोल मुकुंद माधव हरी हरी बोल ! श्रीमद्भगवद्गीता श्री भागवत महापुराण या धर्मग्रंथातून भगवतप्राप्तीचे अनेक उपाय सांगितलेले आहेत. आपल्या मनाला निश्चलपणा प्राप्त व्हावा, मनात विचारांची निर्मिती कमी कमी होत जाऊन ती शेवटी बंद व्हावी, मन निर्विचार व्हावे, विकारांचा प्रभाव शम दमाने कमी कमी व्हावा, सद्गुणांचा विकास व्हावा, यासाठी या धर्मग्रंथात अनेक प्रयोग दिलेले आहेत. पण आपण ते प्रयोग ऐकून सुद्धा, आपण अंगी बाणवत नाहीत.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

वह्निस्तस्य जलायते जलनिधिः कुल्यायते तत्क्षणान्
मेरूः स्वल्पशिलायते मृगपतिः सद्यः कुरङ्गायते।
व्यालो माल्यगुणायते विषरसः पीयूषवर्षायते
यस्याङ्गेऽखिललोकवल्लभतमं शीलं समुन्मीलति ।।

अर्थ – शील हा गुण सर्व लोकांत प्रिय आहे. शीलयुक्त व्यक्तीसाठी अग्नी क्षणात पाण्यासारखा शीतल होतो. समुद्र नदीप्रमाणे लघु होतो. मेरु पर्वत लहान शिलेप्रमाणे होतो. सिंह हरिणाप्रमाणे समान्य होतो. साप माळेचा गुण धारण करतो. तसेच विष जणू काही त्याचेवर अमृताची वर्षा करते. शील या गुणाचे महत्व या श्लोकात भर्तृहरींनी सांगीतले आहे.

लज्जागुणौघजननीं जननीमिवस्वा
मत्यन्तशुद्धहृदयामनुवर्तमानाम्।
तेजस्विनः सुखमसूनपि सन्त्यजन्ति
सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम् ।।

अर्थ – ज्यांना सत्यव्रत हेच व्यसन आहे, असे तेजस्वी लोक सहजच प्राणत्याग करतात, पण लज्जा गुणास उत्पन्न करणाऱ्या, अत्यंत विशुद्ध हृदयाच्या, आपल्या मातेसमान संरक्षित अशा प्रतिज्ञेचा त्याग करत नाहीत. सत्यव्रती जनांचे आचरण कसे आदर्श असते, या विषयी कविराज भर्तृहरींनी येथे सांगीतले आहे.



## जुनाट सर्दीदेखील कायमस्वरूपी बरी होऊ शकते

आरोग्य संजीवनी

ज्योतिर्मय साहित्य

ऋतू बदलाच्या काळात हमखास होणारा आजार म्हणजे सर्दी. प्रत्येकालाच कधी ना कधी सर्दीचा त्रास होतो.

परंतु काहींना मात्र वर्षानुवर्षे सर्दी त्रास देत असते. सर्दीची योग्यवेळी चिकित्सा केली नाही तर पुढे खोकल्यापासून ते दम्यापर्यंत विविध आजार होऊ शकतात.

सर्दीची कारणे

थंड पदार्थांचे सेवन, थंड वातावरणात किंवा एसीत काम करणे, रात्री जागरण, धुळीशी संपर्क येणे, पोट साफ न होणे, गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे, पचन व्यवस्थित नसणे, दिवसा झोपणे या कारणांमुळे सर्दीचा त्रास होतो.

सर्दीची लक्षणे

नाकातून पाणी वाहणे, नाक बंद होणे, वारंवर शिंका येणे, डोके दुखणे किंवा जड होणे, आवाजात बदल होणे, अंग दुखणे, ताप आल्यासारखा वाटणे, दम लागणे अशी अनेक सर्दीच्या रुग्णात सामान्यपणे आढळून येतात. अनेक रुग्णांना तर २-३ रुमाल घेऊन बाहेर पडावे लागते. नाक सतत गळत असते. अनेकांना एकावेळा २०-२० शिंका येतात. धुळीची ॲलजी असणाऱ्यांना धुळीशी संपर्क येताच त्रास सुरू होतो. केवळ चादर झटकल्याचे निमित्त होऊन सर्दीचा त्रास सुरू होतो. औषधे घेतल्यास तात्पुरते बरे वाटते, परंतु परत सर्दीचा त्रास सुरू होतो. वीस-वीस वर्षांपासून सर्दीने त्रस्त असलेले अनेक रुग्ण मी प्रक्टीसमध्ये पाहिलेले आहेत.

सर्दीवरील उपचार

आयुर्वेदीय उपचारांच्या साहाय्याने जुनाट सर्दी देखील कायमस्वरूपी बरी होऊ शकते. पंचकर्मापैकी एक असलेले 'नस्यकर्म' हे सर्दीच्या रुग्णांसाठी एक वरदानच आहे. विशिष्ट पद्धतीने औषधी तेल नाकात सोडण्याच्या प्रक्रियेला नस्यकर्म म्हणतात. नस्यकर्मामुळे नासामार्गातील दोष बाहेर पडून सर्दीची लक्षणे त्वरेने कमी होतात. ॲलर्जीमुळे होणाऱ्या सर्दीमध्ये सुद्धा नस्याचा अतिशय उत्तम उपयोग दिसून येतो. यासोबतच काही आयुर्वेदीय औषधांचे सेवन केल्यास अनेक वर्षांच्या सर्दीचा त्रास कमी होऊ शकतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

काय करावे

कोल्ड्रींक्स, आइस्क्रीमसारख्या थंड पदार्थांचे सेवन टाळावे.

केळी, काकडी, दही, टोमॅटो हे पदार्थ टाळावेत.

गरजेपेक्षा अधिक पाणी पिऊ नये.

पोट साफ राहील याकडे लक्ष द्यावे.

केस धुतल्यानंतर लवकर कोरडे करावेत.

शिंका जास्त येत असल्यास 'क्षवथु तेल ' नाकात टाकावे.

रात्री सर्दीचा त्रास अधिक होत असेल तर झोपताना थोडे फुटाणे खावेत, त्यानंतर पाणी पिऊ नये.

भाताचे प्रमाण कमी करावे.

शक्यतो एसीचा वापर टाळावा.

***




ज्योतिर्मय साहित्य

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. (क्रमशः)

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

छोटी छोटी पण आशय प्रधान असलेली कवितांची कडवी, प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या पद्य रचना आणि त्याचे जोडीला तालवाद्यांचे सूर या माध्यमातून रवींद्रसंगीत सहजपणे जनमानसात पोहोचले आणि लोकप्रियही झाले.

आपल्या संगीतकारकिर्दीच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये त्यांनी आपल्या गीत आणि संगीतात आणखी वेगवेगळे प्रयोग केले. शास्त्रीय संगीत आणि लोकगीतांमध्ये त्यांनी आपल्याला हवे त्याप्रमाणे बदल करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संगीतात माहिती नसलेला कंपोझिशन हा नवीन प्रकार त्यांनी रूढ केला आपल्या संगीत प्रवासात दोन ते अडीच हजारांपेक्षा जास्त गीते लिहून स्वतः त्यांना चाली लावल्या त्याचप्रमाणे त्यांनी नाटक, संगीत आणि नृत्य या तीन कलांचा अद्भुत असा त्रिवेणी संगम घडवून आणला. रवींद्रनाथांचे संगीत हे अस्सल भारतीय असून आज बंगालमधील घराघरांमध्ये तसेच देशाच्या विविध भागांमध्ये निनादत आहे. त्याचे कारण म्हणजे त्याची लोकाभिमुखता आणि हृदयाला भिडण्याची क्षमता.

रवींद्रनाथ स्वतः उत्कृष्ट गायक होते राष्ट्रीय काँग्रेसचे कलकत्त्यात जेव्हा अधिवेशन झाले तेव्हा त्यांनी वंदे मातरम हे गीत अत्यंत तन्मय होऊन म्हटले. त्यांनी गायलेल्या गीतांचा श्रोत्यांवर दीर्घकाळ प्रभाव असायचा. त्यांचे आमार शोनार बांगला हे बांगलादेशचे राष्ट्रगीत असो की आपल्या देशाचे राष्ट्रगीत जन-गण-मन या त्यांच्या रचना अत्यंत अप्रतिम आहेत. आपल्या देशावर तर त्यांचे सर्वच क्षेत्रातील कायमचे न फिटणारे ऋण आहे. रवींद्र संगीताचा प्रभाव बंगालमधील घराघरात आहे. रोबिन्द्रो शोंगीत म्हणून ते प्रसिद्ध आहे. बंगालमध्ये त्याला लोकसंगीताचे मोल प्राप्त झाले आहे. अनेक संगीतकार आणि कवींनी रवींद्र संगीतापासून प्रेरणा घेतली. बॉलिवूडमधील अनेक गीते रवींद्र संगीतावर आधारित आहेत. रवींद्रनाथांनी या क्षेत्रातही एवढे प्रचंड काम करून ठेवले आहे की त्याचा मागोवा घेतल्याशिवाय संगीतकार आणि गायकांना पुढे जाता येत नाही. ''जोदी तारे नाइ चीनी गो शेकी'' हे रवींद्र संगीतातील गाणे वेगवेगळ्या गायकांनी गायले आहे. लिजंडरी सिंगर किशोरकुमार यांनी तर हे गाणे इतके अप्रतिम म्हटले आहे की ऐकताना जणू आपली समाधी लागते. जिज्ञासूंनी हे गीत यु ट्यूबवर अवश्य ऐकावे. याच गीताचा वापर अभिमान चित्रपटातील तेरे मेरे मिलन की ये रैना या गीतात फार सुंदर केला आहे. तसेच चंदा देखे चंदा हे झूठी चित्रपटातील गाणे आमी तोमाय जातो या मुखड्यावरून आणि जोदी तारो या गीतावर आधारित आहे. जलते है किसके लिये, जाये तो जाये कहा, मेघा छाये आधी रात, छुकर मेरे मन को यासारखी अनेक गाणी रवींद्र संगीतावरून प्रेरणा घेऊन जन्माला आली आहेत. संगीतकार अनिल विश्वास, आर डी बर्मन, हेमंतकुमार, सलील चौधरी आदी अनेक संगीतकारांनी रवींद्र संगीताचा वापर आपल्या गीतांमध्ये करून घेतलेला दिसतो. रवींद्रनाथांनी लिहिलेले एकला चलो रे या गाण्याचा वापर तर अनेक संगीतकारांनी आणि गायकांनी वेगवेगळ्या प्रकारे आपल्या कार्यक्रमात केला आहे. संगीत म्हणजे दोन आत्म्यानमधील दुवा असे रवींद्रनाथ म्हणत असत. त्यांच्या संगीताच्या धाग्याने खरे तर संपूर्ण भारतवर्ष जोडले गेले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



**ज्योतिर्मय साहित्य**

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# आदर्श राजमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

**ज्योतिर्मय साहित्य**

आदर्श राजा म्हटलं की छत्रपती शिवाजी महाराजांचं रूप डोळ्यासमोर येतं, तर आदर्श राज्यकर्त्या म्हटलं की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं नाव पुढं येतं. आदर्श कन्या, सुशील भार्या, सर्वगुणसंपन्न माता अन् प्रजाहितदक्ष शासक अशा वैविध्यपूर्ण भूमिकेतून त्यांनी आजीवन जनसेवा केली. इतकेच नव्हे तर, सर्वधर्मियांना विश्वासात घेऊन उत्तम राज्यकारभार केला. महत्वाचे म्हणजे हिंदू-मुस्लिम हे अहिल्यादेवी यांच्या कारकिर्दीत गुण्यागोविंदाने नांदलेत. राजकारणातून समाजकारण करून धर्मपरायणात सर्वोच्च शिखर गाठणाऱ्या अहिल्यादेवींना हिंदू संस्कृतीतील पुण्यश्लोक ही उपाधी बहाल करण्यात आली. ही गोष्ट मराठी जनमानसाच्या दृष्टीने मोठ्या अभिमानाची आहे.

अहिल्यादेवी होळकर ह्या अहमदनगर जिल्ह्यामधील चौंडी गावातल्या धनगर समाजाचे माणकोजी शिंदे-पाटील यांच्या कन्या. वयाच्या बाराव्या वर्षी अहिल्यादेवी यांचा विवाह पेशव्यांचे सुभेदार मल्हारराव होळकर यांचे सुपुत्र खंडेराव होळकर यांच्याशी झाला. परंतू काळाने घात केला अन् दुर्दैवाने १७६६ साली खंडेरावांचे आकस्मिक निधन झाले. तथापि स्वतःला मोठ्या धैर्याने सावरून, मल्हारराव होळकर या पित्यासमान सासऱ्यांची आज्ञा शिरसावंद्य मानत अहिल्यादेवींनी आपले उर्वरित आयुष्य लोकसेवेत व्यतित केले.

स्वकर्तृत्वाच्या बळावर या राजमातेने होळकरांच्या राज्याची धुरा समर्थपणे सांभाळून सर्व जाती-धर्मातील लोकांना समान न्याय दिला. वैधव्याच्या दुःखानं अन् पुत्रशोकानं व्यथित झालेल्या या कर्तृत्ववान व धाडसी मातेनं धिरोदत्तपणे पुनश्च खंबीरपणे उभं राहून होळकर साम्राज्याचा क्रांतीसूर्य तळपत ठेवला. अहिल्यादेवींनी ''मरावे परी कीर्तीरूपे उरावे'' ही उक्ती आदर्श राज्यकारभार करून खरी करून दाखविली.

अहिल्यादेवींनी आपल्या कारकीर्दीत हिंदू देवळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या जीर्णोद्धाररासाठी ठोस उपाययोजना करताना मशिदी, दर्गे यांचा विसर पडू दिला नाही. त्यांच्यासाठी देखील राजकोषात आर्थिक तरतूद केली. बारा ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार तसेच बद्रीकेश्वरपासून रामेश्वरपर्यंत आणि जगन्नाथपुरीपासून सोमनाथपर्यंत अनेक मंदिरे, उद्याने, विश्रामगृहे, अन्नछत्रे, विहिरी, धर्मशाळा, रस्ते, पाणपोया असे विविध लोकोपयोगी उपक्रम राबवून त्यांनी खऱ्या अर्थानं दातृत्वाची भूमिका बजावली. नर्मदा, गंगा, गोदावरी या नद्यांवर घाट बांधल्याने, त्या कालखंडापासून पुढच्या काळातही नद्यांवर घाट बांधण्याचा पायंडा अखंडपणे चालत राहिला आहे. राज्यातल्या गोरगरीब लोकांना राजमाता ह्या नित्यनेमाने अन्नदान, वस्त्रदान अन् सणासुदीला दानधर्महीही करीत असत. चारित्र्यसंपन्नता अन् स्त्रीत्वाचे वैभव जतन करून प्रपंच व परमार्थाची सांगड घालत या महान मातेनं गतकाळातील दुःखद घटनांना पाठीमागे टाकत, आपल्या जीवनाची सुव्यवस्थित घडी बसवली. या पार्श्वभूमीवरच अहिल्यादेवी होळकर यांचा रयतेत आदर्श राजमाता म्हणून नावलौकिक होता अन् आजही आहे.

पुरोगामी विचारसरणी असलेल्या अहिल्यादेवींनी कालबाह्य झालेल्या पूर्वीच्या कायद्यांमध्ये काळानुरूप सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली. विधवांचे धन जप्त करून ते राजकोषात जमा करण्याची जुलमी प्रथा त्यांनी बंद केली. विधवेला मुल दत्तक घेण्याची इच्छा असल्यास तिला तशी कायद्याने मुभा देण्यात आली. न्यायप्रक्रियेत आडकाठी आणणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा देण्याचे अहिल्यादेवींनी फर्मान काढले होते. त्या उत्तम लढवय्या होत्या. त्या राजकारणाबरोबर



अर्थकारणातही पारंगत होत्या. गावोगावी लोकांसाठी जागीच न्यायनिवाडा व्हावा, यासाठी त्यांनी पंचाधिकारी नेमले होते. भिल, गोंड जमातीतील लोकांकडून पडीक जमिनीवर लागवड करून घेतली. त्याद्वारे अहिल्यादेवींनी मल्हाररावांच्या काळापेक्षा अनेक पटीने राजकोषात वृद्धी केली. प्रजेकडून कररूपात प्राप्त झालेल्या धनराशीतून जनहिताचे विविध उपक्रम राबवून प्रजेला सुखी व आनंदी ठेवण्यासाठी त्यांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं. जनसामान्यांबद्दल त्यांच्या अंत:करणात अपार करुणा होती.

उल्लेखनीय बाब म्हणजे अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात शिक्षणावर अधिक भर दिला. होळकरांची राजधानी महेश्वर हे शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते. मराठी, हिंदी पाठशाळेतून संस्कृत भाषेचेही शिक्षण दिले जायचे. याशिवाय वेद-पुराण, शास्त्रे, वेदांत, व्याकरणाचे शिक्षण हे विद्वान-पंडितांमार्फत देण्याची व्यवस्था अहिल्यादेवींच्या कारकीर्दीत करण्यात आली होती. त्यांच्या राजदरबारात शिल्पकार, साहित्यिक, कलाकार, विद्वान-पंडित यांना विशेष मानसन्मान मिळत असे. कवी मोरोपंत, शाहीर अनंत फंदी यांना सरकार दरबारी मानाचे स्थान होते. अहिल्यादेवींनी सैनिकी शिक्षणही घेतले होते. त्या जाबांज लढवय्या होत्या. आपल्या सैनिकांचे मनोधैर्य टिकवून त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने त्या आपल्या सैन्यदलाला वेळोवेळी भेटी देत असत. विशेष म्हणजे अहिल्यादेवींनी आपल्या सैन्यदलात महिलांची विशेष तुकडी तयार केली होती.

अभिमानाची गोष्ट म्हणजे मोगल, टिपू, निजाम, पेशवे यांच्यावर अहिल्यादेवीच्या कर्तबगारीची मोठी छाप होती. परधर्माविषयी त्यांच्या मनात नितांत आदर व सहिष्णुता होती. ''राजा हा विश्वस्तासारखा असावा अन् प्रजेचे कल्याण चिंतणारा असावा'', हा आदर्श त्यांनी आपल्या राज्यकारभारात घालून दिला होता. त्यामुळेच त्यांना एक आदर्श शासनकर्त्या म्हणून रयतेकडून सन्मान मिळायचा. अहिल्यादेवी ह्या प्रजाहितदक्ष राजमाता म्हणून साऱ्या राज्यात किर्तीमान होत्या.

आदर्श राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या पावलावर पाऊल टाकत, त्यांचासारखा राज्यकारभार या पार्श्वभूमीवर शासन जनसामन्यांसाठी लोकहिताचे निर्णय घेत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ सर्वसमावेशक धोरण जाहीर करण्याचा राज्य सरकारचा मानस असून त्याचाच एक भाग म्हणून महिलांना एस.टी. प्रवासात सरसकट ५० टक्के सूट देण्यात आली आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत गोरगरीब महिलांना माहे १५०० रुपये आर्थिक मदत राज्य शासनातर्फे देण्यात येत आहे. राज्यातील कोट्यवधी माता-भगिनींना या योजनेमुळे आर्थिक आधार मिळून त्याद्वारे त्या छोटेखानी उद्योग करून कुटुंबाला हातभार लावत आहेत. विशेष म्हणजे त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहताहेत. याशिवाय वयोश्री योजनेंतर्गत वयोवृद्ध महिला-पुरुषांना मोफत वैद्यकीय सुविधा व उपकरणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. माता सुरक्षित तर घर सुरक्षित या विशेष मोहिमेत महिलांना आरोग्य तपासणी, हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी रुग्णवाहिका, औषधं उपलब्ध करून देणे, यासाठी दोन कोटींचा निधी निर्धारित केला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथील त्यांच्या जन्मस्थळी मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. अशी ही बैठक महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनची पहिलीच बैठक होय. या बैठकीत चौंडीच्या सर्वंकष विकासाचा आराखडा तयार करून त्यासाठी ६८१ कोटी ३२ लाखाची तरतूद करून तिला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील महत्वपूर्ण गोष्टींचे येथे जाणाऱ्या नागरिकांना दर्शन होईल. इतकेच नव्हे तर गत होळकर साम्राज्याची अन् अहिल्यादेवींच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव होईल. अन् त्यांच्या आठवणींना उजाळा मिळेल. खरंतर महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अर्पण केलेली हीच खरी आदरांजली होय.

बंधू भगिनींनो, अल्पवयात विधवा झालेल्या एका स्त्रीनं सर्वधर्मसमभावाची कास धरून सन १७६५ ते १७९५ अशी तब्बल ३० वर्षे इंदूर संस्थानावर अधिराज्य करून भारतीय इतिहासात जणू एक विक्रमच नोंदविला. राजमातेचा मानवतावादी दृष्टिकोन सर्वधर्मीयांना प्रिय होता. मुस्लिम समाजाचे लोक तर अहिल्यादेवींच्या इंदूर संस्थानच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मशिदीत नमाज अदा करून दुवा मागत असत. म्हणूनच सकल जनमानसात पुण्यश्लोक अहिल्यादेवी असे सन्मानाने म्हटले जात असे. अहिल्यादेवी म्हणजे मानवी जीवनातला अज्ञान, अधःकार, दुःख दूर करून त्यास प्रकाशमान करणारी दिव्यज्योत होती. राज्यातील सर्वधर्मीय जनतेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना आदरांजली अन् त्रिवार वंदन!

**लेखक: रणवीर राजपूत, ठाणे**
निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी

**

# जात्यावरच्या ओव्या......



पिवळा पितांबर
मला पुसे सारा गाव
पाठचा दादा माझा
लुटला बाजीराव ॥९९॥

दिवाळीची चोळी
भाऊ फाटून जाईन
आंदण देना गाय
नाव लयदि राहीन ॥१००॥

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# फुलमाला....



मदनबाण...

भरपूर पाकळ्या आणि शुभ्र रंग
हिरव्या पानात खुले मदनबाण
सुगंध खोल गहिरा या फुलांचा
पाहताच सहज हरपते देह भान

या फुलांचा सुकोमल गजरा
भक्ती भावे देवी चरणी वाहते
तृप्त समाधान आणि आनंद
अंतरात माझ्या नित्य राहते..🙏

सौ.माधुरी म. इनामदार, मिरज.

# इंदापूरी निखारे



## मी लक्षाधीश झालो तर...



**ज्योतिर्मय साहित्य**

लहानपणी गुरुजी मस्त शिकवत असतात

वेगवेगळया विषयावर बोलायला लावतात आणि आपण पण बाळबोध पणे बोललेलो असतो

बाळबोध कायमच असतो

लक्षाधीश करणार सर्वांना...हे कोणीही म्हणाले

कितीही मोठे झालो तरी, आपण प्रचंड आनंदी होतो, लक्षाधीश या शब्दातच सामर्थ्य आहे

त्याचीच एक आठवण.

गुरुजी वर्गात आले आम्ही ५/६ वीत असु आल्या आल्या गुरुजींनी विषय दिला

मी लक्षाधीश झालो तर...

वर्गात कधी न बोलणारा मित्र एकदम जोरात ओरडुन म्हणाला सर मी, सर मी बोलतो

आम्ही सगळे मित्र अचम्बीत झालो आणि त्याच्याकडे पाहु लागलो, सर पण एक मिनिट त्याच्याकडे पहातच राहिले, परत हात वर करून जोरात ओरडला सर मी बोलणार, आणि सर म्हणाले ये तु बोल... पहिल्यांदाच बोलत असल्यामुळे सर्व मित्रांनी जोरदार टाळ्या वाजविल्या.. त्याने बोलायला सुरुवात केली...

माझे आदरणीय गुरु बंधु आणि भगिनींनो...

वर्गात एकही भगिनी नव्हती, तरीही ...

सर्व वर्ग शांतपणे ऐकण्यास उत्सुक झाला होता

तर आजचा विषय मी लक्षाधीश झालो तर

बंधूंनो मी जर लक्षाधीश झालो तर मी सर ज्याप्रमाणे आपल्यावर लक्ष ठेवतात त्या प्रमाणे मी पण ठेवीन... सगळे एकदम जोरात हसु लागले...

पुढे तो म्हणाला... मी जर सरपंच झालो तर गावावर लक्ष ...मी जर आमदार झालो तर जिल्ह्यावर लक्ष... मी जर मुख्यमंत्री झालो तर राज्यावर... मी जर पंतप्रधान झालो तर देशावर ...

आपले सर लक्ष कसे ठेवायचे हे शिकवत असतात सरांमुळे मी लक्षाधीश होण्याचे ठरविले...सगळा वर्ग हसून हसून बेजार... आणि तो मित्र मात्र आनंदात होता, त्याला वाटत होते लय भारी बोललो... अर्थात नंतर त्याला कळाले... पण तो बालपणीचा पहिला लक्षाधीश मित्र सगळ्यांचा झाला...आज खुप वर्षा नंतर जाणवले आपल्या आजुबाजुला सतत लक्षाधीश असतात ...

लहानपणी त्याला हसलो होतो... पण ते बरोबर होते... आणि आपली सगळ्यात जवळची लक्षाधीश आपली पत्नी असते... आता कोणी तोंड देखल म्हणत, मी सर्वांना लक्षाधीश करणार

आपण पण भाळून जातो.. अजूनही.. स्वप्नात, खोट्या आनंदात जगणं बहुतेक सर्वांना आवडत...

https://jyotirmaysahitya.com

ही लिंक उघडेल
साहित्याचे दार

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर

- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# राष्ट्रमाता रणरागिनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

ज्योतिर्मय साहित्य

जगा व जगू द्या. शिका, शिकवा, संघर्ष करा व समृध्द व्हा. हा संदेश अहिल्याबाईने समस्त विश्वाला दिलेला आहे. हे कदापिही विसरता येणार नाही. हा अहिल्या संदेश प्रत्येक समाज बांधवापर्यंत पोहचणे गरजेचे आहे.

मध्ययुगीन भारतीय इतिहासात बहुजन सामाजातील अनेक कतृत्वान महिला रत्न होऊन गेल्यात. बहुजनांचे राजे शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या मातोश्री जिजाबाई, हजारो वर्षे ज्ञानापासून वंचित असणाऱ्या समाजाला शिक्षणाची दारे खुली करुन देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. सवतःच्या कुशलतेने, धिटाईच्या राजनितीने ३० वर्षे अखंड इंदोर घराण्यावर राज्य करणाऱ्या अहिल्याबाई होळकर यांची नावे इतिहास पटलावर सुवर्णक्षरांनी कोरली गेली, असे म्हटले तरी उचित व योग्य वाटेल. सद्यस्थितीत तरी अहिल्याबाई होळकरांचा खरा इतिहास जगा समोर येणे हे गरजेचे आहे. घोड्यावर स्वार होऊन हातातील नंग्या तळपत्या तलवारी, तीव्र कुशाग्र बुध्दीमत्तेने नि प्रचंड धैर्याने पोलादी सामर्थ्याला लाजवेल असा राज्यकारभार करणाऱ्या राष्ट्रमाता रणरागिनी अहिल्याबाई होळकर यांचा हा खरा इतिहास आहे. अहिल्याबाई सात्विक, सोजवचळ आणि नितिमान होत्या. परंतु आपले हळवेपण त्यांनी कधीच कर्तव्याच्या आड येऊ दिले नाही. पती खंडेराव पासून अहिल्याबाईस भालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. कुंभेरीच्या लढाईत शत्रूशी लढता लढता पती खंडेरायांना वीर मरण आहे. ऐन तारुण्यात अहिल्याबईला वैधव्य आले. तत्कालिन कालानुरुप पती बरोबर अहिल्या सती जाण्यास निघाल्या. मुलगा खंडेरायाच्या मृत्यूपेक्षाही अहिल्या सती जाणार यांचे दुःख मल्हाररावांना झाले.

''तेंव्हा ते मोठयाने म्हणाले अहिल्या आता तूच माझा शेवटचा आधार आहेस, तू जर गेलीस तर होळकरांचे सिंहासन कोण सांभाळणार ? तलवार बहादूर आपले सासरे परिस्थितीने परेशान होऊन हात जोडतात. यामुळे अहिल्या हळव्या झाल्यात. त्या धीरगंभीर झाल्यात. तळहातावरील फोडा प्रमाणे जपलेल्या प्रजेच्या जीवासाठी सती जाण्याचा बेत तात्काळ रद्द केला.''

हाच तर भारताच्या इतिहासाने पतीचया अमानुष प्रथेला सती जाण्याचा पहिला हादरा होता. एका धाडसी स्त्री रत्नाने कोणाच्याही दडपणाला बळी न पडता प्रत्यक्षात ही प्रथा बंद पाडण्याची सुरुवात सवतः पासून केली. अहिल्याबाई नेहमी म्हणत मी जात मानत नसते. माणसाचे कर्तव्य पाहते. रणरागिनी महाराणीची दरबारातील घोषणा शिरोधार्य मानून वीर यशवंत फणसे मोहिमेवर स्वार झाले. थोडयाच वेळात यशवंतांनी दरोडेखोरांना सळो की पळो करुन सोडले. त्यांच्या म्होरक्याच्या मुसळया आवळून महारानी समोर हजर केले. यशवंतरावाचा अफाट पराक्रम पाहून बाई भारावल्या. आपल्या दिलेल्या वचनाशी ईमान राखून मुक्ताबाईचा वीर यशवंत फणसे सोबत आंतरजातीय विवाह केला. स्वतःच्या मुलीचा पोटजातीशी विवाह करुन स्वतःपासून सुरुवात केली. मुला-मुलींच्या लग्नाची बाबतीत रोटी व्यवहार चालायचा. पण बेटी व्यवहार चालत नसे. हा अमानुष व जुलमी कायदा होता. बेटी व्यवहार सुरु करुन जातीभेदाला तीलांजली दिली व हा कायदा रद्द केला. अहिल्याबाई होळकरांचा हा प्रखर संघर्षच म्हणावा लागेल. आजच्या कठिण परिस्थितीतही विविध समाजात मुली मुलांच्या लग्नाच्या बाबतीत अनेक प्रश्न व समस्या निर्माण झाल्या आहेत. एकाच समाजात किंवा एकाच जातीत योग्य ती वधु किंवा वर मिळायला तयार नाही. यामुळे अर्ध्या वयाच्या अनेकांचे अर्धे आयुष्य निघून जात आहे. तरी लग्न जुळत नाही, होत नाही. तेंव्हा लग्न न जुळणे हा गुंतागुंतीचा कौटुंबिक समस्या वाढत आहे. करिता इतर समाज व धनगर समाजानेही अहिल्याबाई होळकरांचा आदर्श घ्यावा. आंतरजातीय पोटजातीय मुलामुलींचे विवाह जुळवून आणावेत. आपल्या मानसिकतेत बदल करुन ही समस्या व गुंता सोडवावा असे मनोमन मला वाटते.

अहिल्याबाईचे न्याय देण्याचे तत्व इतके कठोर होते की, प्रजनन, अधिकारी, नातलग, मुलगा किंवा सेनापती इत्यादी सर्वांनाच समान न्याय होता. एकदा रागावलेल्या खंडेरावांनी भर दरबारात जमा खर्चाची वही भिरकावली तेंव्हा कर्तव्य कठोर अहिल्यांनी आदेश बजावला की, दरबाराचा रिवाज न पाळणाऱ्यास व संस्थानची वही भिररकवणाऱ्यास २५ मोहरा दंड करा नि त्याच्या वैयक्तिक उत्पन्नातून वसुल करा. इतकेच नाही तर स्वतःचा एकुलता एक मुलगा भालेराव यास गुन्हाचा आरोप सिध्द होताच

पाच कोड्याची शिक्षा फर्मावली. भाचा राणोजी शिंदे याला त्याच्या गर्विष्ठ स्वभावामुळे आणि दुसऱ्यांना त्रास देण्याच्या वृत्तीमुळे तो शूर असूनही तातडीने त्याला आपल्या सैन्यातून बउतर्फ केले. गुन्ह्याची शिक्षा त्वरीत मिळाली पाहिजे हा त्यांचा कर्तव्यधिष्ठीत न्यायनिवाडा होता.

गौरव, मान, सन्मान, पुरस्कार ही कुणाची देण आहे, तर अहिल्याबाईची म्हणावी लागेल. का तर बाईसाहेब राज्यघराण्यात विदवानांचा, कलावंताचा, विचारवंतांचा गौरव केला जायचा. बक्षीस रुपाने

त्याांची विद्वत्ता, कलागुण ओळखून मान, सन्मान दिला जायचा. विशेष म्हणजे नवसाहित्य निर्मितीसाठी नवलेखकांना अनुदान देऊन प्रोत्साहन दिले जायचे. केवळ लोककल्याणासाठी जीवन समर्पित करणाऱ्या अहिल्याबाईनी न भूतो भविष्याती अशी लोककल्याणकारी कामे केली. घाट, मंदिरे देशभर बांधली. भुयारी मार्ग काढले, गोरगरीबांना औषधोपचारांसाठी मोफत दवाखान्याची सोय केली. पर्यावरणाचा संदेश दिला. प्रत्येक शेतकऱ्याने वीस झाडे लावालीच पाहिजे असे फर्मान काढले. अभयारण्य निर्माण केली. पक्षी, जलचर खेरराची काळजीही बाई रयतेसारखीच घेत. यामुळे मातोरीच्या राज्यात किडे, मुंग्याही उपाशी मरत नाही असे लोक अभिमानाने म्हणायचे.

सर्वसमान्यजणांना व गरीबांना आपल्या दिव्य व्यक्तीमत्वाने भारावून सोडणाऱ्या, आदराने झुकण्यास लावणाऱ्या धन्य त्या अहिल्यामाता, लोकमाता या रणरागिनीने इंदौर घराण्यावर ३० वर्षे राज्य करुन १३/०८/१७९५ (श्रावण) १४ शके वयाच्या ७० व्या वर्षी महेश्वर येथे नर्मदा नदीकाठी अजरामर झाल्यात. अशा या थोर राष्ट्रमाता, रणरागिनी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांना आज जयंती दिनी कोटी कोटी विनम्र अभिवादन.




**मल्हारराव नाचण डोणगांवकर**
(मुक्त वृत्तपत्र लेखक)
मो. ९०२२१८५७१६
न्यु गणेश नगर, अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती संभाजीनगर

## केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते 'खासदार परिचय पुस्तिका' प्रकाशित



ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली** – महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत नवी दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्र निर्मित 'खासदार परिचय पुस्तिका'चे प्रकाशन केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आयुष भवन, नवी दिल्ली येथे आज पार पडले. यावेळी उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा, मंत्री महोदयाचे अपर खासगी सचिव राहुल साळुंखे उपस्थित होते.

प्रतापराव जाधव म्हणाले की, महाराष्ट्र परिचय केंद्राने अतिशय उपयुक्त आणि जनसामान्यांसाठी प्रभावी असा उपक्रम हाती घेतला आहे. लोकप्रतिनिधींची माहिती एकाच ठिकाणी मिळणे ही काळाची गरज असून, ही पुस्तिका माहितीच्या पारदर्शकतेस हातभार लावेल. अशा उपक्रमांमुळे जनसंपर्क अधिक प्रभावी होत असून शासनाच्या प्रयत्नांना दिशा मिळते.

या पुस्तिकेत महाराष्ट्रातील लोकसभा आणि राज्यसभा खासदारांची तपशीलवार माहिती समाविष्ट करण्यात आली असून, त्यामध्ये खासदारांचे नाव, जन्मतारीख, नवी दिल्ली व मतदार संघातील निवासी पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल पत्ता, स्वीय सहायकांचे संपर्क क्रमांक तसेच सोशल मीडिया हँडल्स यांचा समावेश आहे. ही माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध करून देत जनता आणि लोकप्रतिनिधींसोबत यांच्यातील संवाद अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्याचा उद्देश या उपक्रमाने साध्य होत आहे.

महाराष्ट्र परिचय केंद्राने यापूर्वीही अनेक उपयुक्त उपक्रम यशस्वीरित्या राबवले आहेत. दिल्ली डिरेक्टरीसह २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी प्रकाशित करण्यात आलेली 'लोकसभा पूर्वपिठीका' ही पुस्तिका याच केंद्राची कल्पकता आणि गुणवत्ता अधोरेखित करणारी ठरली होती. त्या यशाची परंपरा 'खासदार परिचय पुस्तिका' ने ही समर्थपणे नेण्याचे प्रामाणिक प्रयत्न कार्यालयाकडून करण्यात येत आहेत.

या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी उपसंचालकअमरज्योत कौर अरोरा यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल रामेश्वर बर्डे, सहायक ग्रंथपाल निलेश देशमुख आणि दीपक देशमुख यांनी विशेष मेहनत घेतली.

ही पुस्तिका शासकीय विभाग, माध्यम प्रतिनिधी, संशोधक आणि जनतेसाठी एक विश्वासार्ह संदर्भस्रोत म्हणून कार्य करणार असून, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे उदाहरण ठरेल.

# भारतीय स्वातंत्र्याच्या दुसऱ्या पायरीचा उठाव

ज्योतिर्मय साहित्य
**(मगील अंकावरून)**

ब्रिटिश इंडियन आर्मीमध्ये भारतातून लाखो साधारणपणे २५ लाख युवकांचे भारतीय ब्रिटिश सैन्यात भरती झाली. सैन्यात भरती करण्यात आली होती. हे सैनिक ब्रिटनसाठी दुसऱ्या महायुध्दात विशेषतः सिंगापुर, बर्मा, मलेशिया,इटली, इराण आणि आफ्रिकेत लढत होते. १९४२ मध्ये जपानने सिंगापूर जिंकले आणि अंदाजे ४०,००० भारतीय सैनिक जपानी सैन्याचे युद्धकैदी झाले. हीच ती वेळ होती जेव्हा नेताजींनी या सैनिकांना आपल्या अमोध भाषणाने प्रभावित करत ब्रिटीशांच्या गुलामगिरीत परत जायचे का? की भारतासाठी लढत स्वातंत्र्य मिळवायच? असा पर्याय देत बहुतांश सैनिकांना इंडियन नॅशनल आर्मीमध्ये जपानच्या सहकार्याने भरती केले. ही सेना म्हणजेच ''आझाद हिंद फौज''. आझाद हिंद फौजेमधील बरेचसे सैनिक पूर्वीच्या ब्रिटीश फौजेतील होते. तसेच नवीन भरती करण्यात येऊन आझाद हिंदी फौज सेना वाढविण्यात आली. आझाद हिंद फौज या सेनेने प्राण पणाला लावून भारतासाठी लढा दिला. त्यांची ही भूमिका इतिहासात भारतीय स्वातंत्र्याच्या दुसऱ्या पायरीचा उठाव म्हणून नोंदली गेली आहे. ब्रिटिश भारतीय सैन्याचे अनेक सैनिक जरी शत्रूपक्षात लढत होते, तरी त्यांच्यापैकी हजारोंनी आपली दिशा बदलली आणि नेताजींच्या आझाद हिंद फौजेमध्ये ते सामील झाले. त्यांचा लष्करी विजय जरी मर्यादीत असला तरी त्यांच्या प्रेरणादायी कृतींनी भारतीय जनतेत स्वातंत्र्याच्या भावना अधिक तीव्र केल्या. आझाद हिंद फौज हे एक वळण होते, जिथे बहुतांशी सैनिकांनी स्वामीभक्ती नव्हे, तर देशभक्तीची निवड केली.

थायलंड ते बर्मा हा रेल्वे मार्ग करून घेण्यासाठी साधारणपणे जपानने कैद केलेले ६५००० ते ७०००० सैनिक या कामासाठी जुंपले होते. यामध्ये साधारण ३०,००० ब्रिटिश सैनिक, १३,००० ऑस्ट्रेलियन






सैनिक, १८,००० डच सैनिक आणि सुमारे ३००० भारतीय सैनिक जे ब्रिटिश निष्ठ आणि ब्रिटनच्या भितिमुळे आझाद हिंद फौजेमध्ये सामील झाले नाहीत अशांचा समावेश होता. तसेच साधारण २ लाख आशियाई सिव्हिलियन मंजूर जे बर्मा, थायलंड, मलाया इथून आणलेले त्यांचा समावेश होता. या सर्वांवर अमानुष परिस्थितीत पूल व रेल्वे बांधण्याचं काम लादण्यात आलं. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेमुळे बहुतांशी सैनिकांना अशा अमानुष काम करण्यापासून तसेच वागणुकीपासून मुक्तता मिळून भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी योगदान देण्याची संधी मिळाली. त्यांचे जीवन भारत देशासाठी महत्वाचे तसेच जाज्वल्यपूर्ण संघर्षाने मानाचे ठरले. स्वतःच्या देशासाठी मरावं ही प्रेरणा नेताजींमुळे या सैनिकांच्या मनात निर्माण होऊन त्यांचे कामाची नोंद इतिहासात गौरवाने नोंदली गेली. थायलंड ते बर्मा या रेल्वेमार्गासाठी काम करणा-यांचा मृत्यू दर हा दहा माणसामागे एक टक्क्यांहून अधिक होते.भारतीय युद्ध कायद्यांचा मृत्यू दर ब्रिटिश, ऑस्ट्रेलियन, डज सैनिकांपेक्षा थोडा कमी होता, कारण त्यांना स्थानिक भाषा, हवामान, वर्तन यांची थोडीफार सवय होती. उष्णता, डास, कॉलरा, डेंग्यू, अन्नाची कमतरता त्यामुळे उपासमार यामुळे हजारो युद्धकौदी तसेच मजूर मृत्युमुखी पडले.

महावीर चक्र विजेते एअर कमांडर रमेश बेनेगल यांनी त्यांच्या १७ व्या वर्षी त्यांना जपानमध्ये सैनिकी शिक्षण घेण्यासाठी जात असताना ब्रिटिश सैनिकांच्या दुर्दशेचा कथन केलेला अनुभव अंगावर काटा आणणार आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबरोबर गप्पा मारण्याचा, जेवणाचा जपानला ट्रेनींगला जाण्यापूर्वी आणि ट्रेनीग चालू असतान जपानमधील टोकियो येथे ट्रेनिंग सेंटरवर आलेला अनुभव रमेश बेनेगल यांचे आयुष्य बदलून आणि सुजलाम सुफलाम करणारा होता. रमेश बेनेगल म्हणतात... दोन्ही वेळेला नेताजींनी प्रत्येकाशी हात मिळवून आमचा निरोप घेतला. आणि जयहिंदअसे म्हणून ते निघुन गेले. आझाद हिंद सेनेची ही खासियत होती. त्याकाळी आझाद हिंद सेनेशी निगडीत असणारी प्रत्येक व्यक्ती एकमेकांना भेटल्यावर आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत जयहिंद असेच म्हणत असे.नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यामुळे जपानी फौजेने कैद केलेल्या भारतीय सैनिकांची सुटका होऊन भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी योगदान देता आले तसेच मजूर म्हणून काम करण्याच्या दुर्दशेतून ते वाचले हे महत्त्वाचे. ही बाब समाजापुढे आली पाहिजे हे नक्कीच.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559